MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २९९/२००८/ दिनांक :

श्री. भगवंत भिमराया गायकवाड, अर्जदार
रा. तिकोंडी, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
विश्रामबाग , सांगली. विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ,
जिल्हा सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
महावितरण, उप विभाग, संख, जि. सांगली

**कोरम** :- १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : १९.०५.२००९

सदरचा तक्रार अर्ज हा अर्जदार श्री. भगवंत भिमराया गायकवाड यांनी त्यांचे शेतीपंपास वीज जोडणी मिळणे बाबत दिलेला आहे. त्यांचे म्हणणे की, ता. १८.६.२००८ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष. सांगलीकडे त्यांनी विद्युत पुरवठा न झाले बाबत अर्ज दिला होता. त्यास सुमारे ६ महिने होऊन गेले असतांनाही आजतागायत त्यांना विद्युत पुरवठा झोला नाही. सबब कृती मानके प्रमाणे नुकसान भरपाई मिळावी अथवा विद्युत पुरवठा करणेत यावा.

सदरचा अर्ज हा अर्जदाराचे प्रतिनिधी श्री. मुल्ला यांचेकडून अर्जदाराने आपला अंगठा उठवून दिला आहे. असा अर्ज ता. १९.१२.२००८ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला. या बाबत वि.प.ला नोटीस काढून म्हणणे मागविण्यात आले. नोटीसीप्रमाणे कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांनी म्हणणे दिलेले आहे.



त्याप्रमाणे अर्जदाराने ता. २१.१.२००५ रोजी चाचणी अहवाल दिला. परंतु जागेवर पाहणी केली असता. विद्युत संचाची मांडणी केलेली नव्हती. सदरील प्रकरणामध्ये सांगली अंतर्गत कक्षाने त्यांचेकडील तक्रारीवर ता. ८.९.२००८ रोजी निर्णय दिला आहे व त्या निर्णयाप्रमाणे ग्राहकाने जरुर ती पूर्तता केलेनंतर कृती मानके प्रमाणे त्यांना विद्युत पुरवठा करणे बाबत आदेश दिलेले आहेत व नुकसान भरपाईची निश्चिती करण्या बाबत सांगण्यात आलेले आहे. वि.प.चे म्हणणे की, अर्जदाराने ता. २६.९.२००८ रोजी पुन्हा चाचणी अहवाल दिला आहे. अर्जदाराचे विद्युत पुरवठ्याकामी ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम करणे आवश्यक असलेने ते करुन ता. २२.१२.२००८ रोजी अर्जदारास वीज जोडणी दिलेली आहे व त्याबाबतचे अर्जदाराकडून पत्रही घेतलेले आहे.

या प्रकरणाची सुनावणी सांगली येथे ठेवण्यात आली. परंतु त्यावेळी अर्जदारातर्फे कोणीही हजर झाले नाहीत. मात्र वि.प.तर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ हजर होते व त्यांनी सदरील ग्राहकाचे स्थळ पाहणी बाबतचा अहवाल तसेच अंतर्गत कक्षाच्या निकलाची प्रत व ता. २२.१२.२००८ रोजी विद्युत पुरवठा मिळाला असल्या बाबतचे ग्राहकाचे पत्र दाखल केले आहे.

या सर्व बाबींचा विचार करता, ग्राहकाचे वीज जोडणीचे काम कृती मानके प्रमाणे अर्जदाराकडून जरुर ती पूर्तता झालेनंतर ३ महिन्याच्या कालावधीमध्ये अपेक्षित आहे. अर्जदाराने सुरुवातीस ता. २१.१.२००५ रोजी दिलेल्या चाचणी अहवालाप्रमाणे त्याने जागेवर विद्युत संचाची मांडणी केली नव्हती व त्या बाबतचा अहवाल वि.प.तर्फे दाखल करण्यात आलेला आहे. तदनंतर ता. २६.९.२००८ रोजी ग्राहकाने चाचणी अहवाल दिल्यानंतर जरुर ते खांब उभारणे व तारांचे जाळे टाकण्याचे काम करुन ता. २२.१२.२००८ रोजी अर्जदारास विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. असा विद्युत पुरवठा हा त्याच्या अर्जाची त्याने पूर्तता केल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीमध्ये झालेला असल्याने अर्जदारास नुकसान भरपाई देणेचा प्रश्न उदभवत नाही. सबब त्यांचे अर्जाची मुदतीमध्ये पूर्तता झाली असल्याने अर्जदाराचा अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. सबब आदेश.

## <u>आदेश</u>

१) तक्रार अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १९.०५.२००९

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..